# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB | Racold | legrand | HAVELLS | INDOASIAN
Finolex | KOLORS | USHA | PHILIPS | GreatWhite | SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर | वर्ष ४ थे | अंक २६ वा | मंगळवार दि.२५ जून २०२४ | पृष्ठे ४ | स्वागत मूल्य २ रू.


# रेणापूरचे भ्रष्ट पीआय अनंत्रे यांच्या बदलीनंतरच पोलीस ठाण्यातील भाजपाचे ठिय्या आंदोलन मागे





लातूर : – गुन्हेगारांना पाठीशी घालणारे अवैध धंद्यांना पाठबळ देणारे आणि सर्वसामान्य जनतेला वेठीस धरून जाणीवपूर्वक त्रास देणाऱ्या प्रत्येक घटकाकडून लक्ष्मी दर्शन याच उद्देशाने कार्यरत असणारे रेणापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक अनंत्रे यांची जिल्हा नियंत्रण कक्षात तडकाफडकी बदली करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा पोलीस उपअधीक्षक गजानन भातलोंढे यांनी दिल्यानंतरच भारतीय जनता पार्टीच्या वतीने रेणापूर पोलीस ठाण्यात सुरू करण्यात आलेले ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले.

रेणापूर पोलीस ठाण्याच्या निरीक्षकपदाची अशोक अनंत्रे यांनी सूत्रे हाती घेतल्यापासून संपूर्ण तालुकाभरात मटका, जुगार, गावठी दारू यासह विविध अवैध धंद्यांना उत आला आहे, यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले असून अनेक जण देशोधडी द्यायला लागले आहेत. गुन्हेगारांना भीती राहिली नाही, कायदा आणि सुव्यवस्था अबाधित नसल्याने सर्वसामान्यांना जगणे मुश्किल झाले असून पोलीस जनतेच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आहेत की अवैद्य व्यवसायिकांना पाठबळ देण्यासाठी असा प्रश्न पोलीस निरीक्षक यांच्या कार्यपद्धतीतून निर्माण झाला आहे.

अवैद्य व्यवसायिकांना पाठबळ देणारे, गुन्हेगारांना पाठीशी घालणारे आणि समाजातील शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी वाहन चालक यासह सर्वच घटकांकडून केवळ लक्ष्मी दर्शन करिता कार्यरत असलेले रेणापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आशोक अनंत्रे यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे या मागणीसाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने तालुकाध्यक्ष ड दशरथ सरवदे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी सकाळी पोलिस ठाण्याच्या दारात ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी भ्रष्ट आशोक अनंत्रे यांची तात्काळ बदली झालीच पाहिजे. होत कशी नाही, झालीच पाहिजे. भारत माता की, जय वंदे मातरम अशा गगनभेदी घोषणा देऊन पोलीस ठाण्याचा परिसर दणाणून सोडला होता.

आंदोलन प्रसंगी जिल्हा पोलीस उपअधिक्षक गजानन भातलोंढे यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेतली असता जोपर्यंत बदली होत नाही तोपर्यंत आंदोलन चालूच राहील अशी कठोर भूमिका घेतल्याने जिल्हा पोलीस अधिक्षक सोमय्य मुंडे यांच्याशी चर्चा करून आंदोलनकर्त्यांच्या भावना सांगितल्या. दरम्यान भाजपाचे नवनाथ भोसले, ड. दशरथ सरवदे, सतीश आंबेकर, चंद्रकांत कातळे, श्रीमंत नागरगोजे, दत्ता सरवदे यांच्यासह इतर अनेकांनी पोलीस निरीक्षक अनंत्रे यांचे विविध भ्रष्ट कारभाराचे प्रताप आपल्या मनोगतातून उपस्थितांना सांगितले. अखेर पोलीस उपअधीक्षक भातलोंढे यांनी पोलीस निरीक्षक अशोक अनंत्रे यांना जिल्हा नियंत्रण कक्षात पाठविण्यात येत असल्याचे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक एन बी चौधरी यांच्याकडे रेणापूर पोलीस ठाण्याचा कारभार देण्यात येत असल्याचे सांगितल्यानंतर सदरील ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले.

रेणापूर पोलीस ठाणे परिसरात झालेल्या या ठिय्या आंदोलनात भाजपाचे अनिल भिसे, वसंत करमुडे, अभिषेक आकनगिरे, अमर चव्हाण, शरद दरेकर, अच्युत कातळे, संतोष तूरूप, श्रीकृष्ण पवार, शरद राऊतराव, उज्वल कांबळे, उत्तम चव्हाण, अनुसया फड, शीला आचार्य, शिवमुर्ती ऊरगुंडे, सोमनाथ चिल्लरगे, विजय चव्हाण, वाजिद सय्यद, शालिक गोडभरले, विठ्ठल कस्पटे, संतोष राठोड, प्रल्हाद फुलारी, चंद्रकांत आलापुरे, हनुमंत भालेराव, प्रताप भुरे, राजकुमार मानमोडे, शिवाजी जाधव, दिलीप चव्हाण, बलभीम जाधव, रानबा मुळे, शेख जलील, दिलीप पाटील, नरसिंग येलगटे, जयप्रकाश जटाळ, पृथ्वीराज उर्गुंडे, ओम चप्पे, लखन आवळे, रमा चव्हाण, गणेश चव्हाण, अमरदीप माने, राजू आतार, नरसिंग चपटे, ओम चव्हाण, बाळू पाटील, लक्ष्मण खलंग्रे, योगेश पनगुले, ऋषिकेश गायकवाड, पंकज काळे, सदाशिव राठोड, अनिकेत बुडडे, आकाश चव्हाण महादेव माने यांच्यासह तालुक्यातील शेकडो भाजपाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# सर्व समाज घटकांना सोबत घेवून सर्वांगीण विकासाला प्राधान्य– क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

## उदगीर येथे जगदंबा बोधन देवी सभागृह, महर्षी वाल्मिकी भवनचे भूमिपूजन





लातूर :– समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेवून विकास करण्याला आपण आजपर्यंत प्राधान्य दिले आहे. त्यानुसार उदगीर, जळकोट तालुक्यातील शहरी आणि ग्रामीण भागात मूलभूत सुविधांची निर्मिती आणि विविध विकासकामे करण्यात आल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी उदगीर येथे बोलताना सांगितले.

उदगीर शहरातील बोधन नगर येथील जगदंबा बोधन देवी सभागृह आणि महर्षी वाल्मिकी भवनचे भूमिपूजन ना. बनसोडे यांच्या हस्ते झाले. प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, नगरपरिषद मुख्याधिकारी सुंदर बोंदर, जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष राहूल केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, लातूरचे माजी नगराध्यक्ष व्यंकट बेंद्रे, मंदिराचे विश्वस्त नामदेव आपटे यावेळी उपस्थित होते.

समाजातील प्रत्येक घटकाचे प्रश्न, समस्या सोडवून त्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य, दळणवळण, पाणी पुरवठा आदी विविध मूलभूत सुविधांची कामे करण्यावर आतापर्यंत भर देण्यात आला आहे. जगदंबा बोधन देवी सभागृहासाठी सुमारे ५५ लाख रुपये आणि महर्षी वाल्मिकी भवनासाठी ५३ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. हे काम रेखीव आणि गुणवत्तापूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. आवश्यकता भासल्यास आणखी निधी देण्यात येणार असल्याचे ना. बनसोडे म्हणाले. उदगीरसाठी स्वतंत्र उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय मंजूर झाले असून लवकरच हे कार्यालय कार्यान्वित होणार आहे. तसेच शहरातील भूमिगत गटार योजनेसाठी जवळपास ४०० कोटी रुपये निधी मंजूर झाला असून या कामाची निविदाही लवकरच निघेल. यासोबतच उदगीर, जळकोट तालुक्यातील विविध विकास कामांचे लोकार्पण येत्या काही दिवसांत होणार असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले.

माजी जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. केंद्रे, माजी नगराध्यक्ष श्री. निटुरे, श्री. बेंद्रे यांनी मनोगत व्यक्त केले. जगदंबा बोधन देवी मंदिराचे विश्वस्त नामदेव आपटे यांनी प्रास्ताविक केले.

# मराठा आरक्षण आंदोलन भरकवटण्याचा डाव : मनोज जरांगे-पाटील



मराठा आंदोलन भरकटवण्याचा डाव सुरु आहे. त्यांना दंगली घडवून आणायच्या आहेत, असा आरोप करत आपल्या भविष्यासाठी तयार राहा. मागे हटू नका, तुम्ही तुमची एकजुट दाखवा. येत्या सहा जुलैला होणाऱ्या मराठा जनजागृती रॅलीत सहभागी व्हा, असे आवाहन मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी आज (दि.२४) माध्यमांशी बोलताना केले. अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलत असताना जरांगे-पाटील जातीयवाद निर्माण करत आहोत, असा आरोप केला होता. मनोज जरांगे-पाटील यांनीही याला सडेतोड उत्तर दिले होते.आपली जात संकटात सापडली आहे

छत्रपती संभाजीनगरमधून माध्यमांशी बोलताना मनोज जरांगे-पाटील म्हणाले की, येत्या सहा जुलै रोजी होणाऱ्या मराठा जनजागृती रॅलीमध्ये सहभागी व्हा. आता आपण जशास तसे उत्तर द्यायच. आपली जात संकटात सापडली आहे. आपल्या भविष्यासाठी तयार राहा. आता आबोसीतून आरक्षण मिळाल्याशिवाय मागे हटणार नाही, असे पुन्नरुच्चार त्यांनी केला. मेलो तरी मराठ्यांना आरक्षण मिळवून देणार जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे; पण तुम्ही मागे हटू नका. तुम्ही तुमची एकजुट दाखवा. आपल्या भविष्यासाठी एक व्हा. मराठा कडवट आहे भित्रा नाही. मराठ्यांनी मराठ्यांवरच आरोप करणं बंद करा असे म्हणतं मी आरक्षणाच्याच बाजुने उभा राहणार आहे. मी मेलो तरी मराठ्यांना आरक्षण मिळवून देणार असल्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

# पक्ष संघटना बळकट करा, विकासकामांची जबाबदारी माझी : आ. शेखर निकम

## कुटरे येथील राजेंद्र मोलक यांच्यासह कार्यकर्त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेशावेळी आश्वासन




कार्यसम्राट आमदार शेखर निकम यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून कोकरे जिल्हा परिषद गटातील कुटरे माजी पंचायत समिती सदस्य राजेंद्र मोलक आणि कुटरे माजी सरपंच सुवर्णा मोलक याच्यासह कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये प्रवेश केला आहे.

चिपळूण / प्रतिनिधी: आमदार शेखर निकम यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेऊन कोकरे जिल्हा परिषद गटातील कुटरे माजी पंचायत समिती सदस्य राजेंद्र मोलक आणि कुटरे माजी सरपंच सुवर्णा मोलक यांच्यासह कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षामध्ये प्रवेश केला. यावेळी आमदार शेखर निकम यांनी प्रवेशकर्त्यांचे जंगी स्वागत केले.

आमदार शेखर निकम यांचे अगोदरपासून गावागावात विकास करण्याचे ध्येय होते आणि त्या सानिध्यातून त्याचे समाजकार्य चालूच होते. मात्र आमदार होण्याची संधी त्यांना जनतेच्या माध्यमातून मिळाली. जनतेने त्यांच्यावर विश्वास दाखवला आणि आमदार झाल्यापासून त्यांनी प्रत्येक गावात नियोजनबद्ध असा विविध विकास कामाचा झपाटा लावला. त्यातून त्यांनी जनतेच्या मनात एक वेगळीच भूरळ पाडली व जनतेमध्ये छाप पाडली. कला, क्रीडा, पर्यटन, शिक्षण, उद्योग व ग्रामिण भागातील विविध विकास कामे करत तसेच बरेचशे प्रलंबीत प्रश्न अधिवेशनामध्ये मांडून जनतेला न्याय मिळवून दिला.

यामध्ये लक्ष्मण चिनकटे, संतोष सुटाके (बारक्या), मारुती सावरटकर, रामकृष्ण सावरटकर, सुरेश निकम, प्रकाश निकम यांचा समावेश आहे. या प्रवेशकर्त्यांचे आमदार शेखर निकम यांनी आभार मानले व राष्ट्रवादी पक्षामध्ये स्वागत केले.

पक्षांर्गत कामे करताना संघटीत होवून कामे करा व पक्ष वाढवण्याच्या दृष्टीने जास्तीत-जास्त प्रयत्नशील रहा. यामध्ये लहान-मोठे, पदाधिकारी-कार्यकर्ते, जूने-नवीन कार्यकर्ते हा भेदभाव विसरुन सर्वांनी एकमेकांना विश्वासात घेऊन पक्ष संघटना बळकट करण्याचा निर्धार करा. विकास कामांची, निधीची तुम्ही चिंता करु नका ती माझी जबाबदारी राहील, असा शब्द आमदार निकम यांनी ग्रामस्थांना दिला. आपणास दिलेली आश्वासने पुर्ण करण्यास कायम कठीबद्ध राहणार असल्याचे देखील त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले.

यावेळी राजेंद्र पोमेडकर, जाकीर शेखासन, सुशिल भायजे, तालुका उपाध्यक्ष दत्ताशेठ गुजर, सह-सचिव सुधिर राजेशिर्के, कोकरे जि. प. अध्यक्ष संजय कदम, बाळू राजेशिर्के, बुवा धावडे, संतोष राजेशिर्के इ. पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# विधानसभेसाठी महादेव जानकरांचा स्वबळाचा नारा

पुणे : प्रतिनिधी महायुतीतील घटकपक्ष राष्ट्रीय समाज पक्षाने विधानसभा निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. इतकंच नाहीतर विधानसभा निवडणुकीसाठी एकूण १०४ जागांवर महादेव जानकर यांच्याकडून तयारी सरू करण्यात आली आहे.



दरम्यान, परभणी लोकसभेत महायुतीचे महादेव जानकर यांचा दारुण पराभव झाल्यानंतर महायुतीकडून आता विधानसभेची तयारी सुरू करण्यात आली आहे. महायुतीतील घटकपक्ष राष्ट्रीय समाज पक्षाने विधानसभा निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. इतकंच नाहीतर विधानसभा निवडणुकीसाठी एकूण १०४ जागांवर महादेव जानकर यांच्याकडून तयारी सरू करण्यात आली आहे. त्यानुसार, राष्ट्रीय समाज पक्षाकडून मतदारसंघाची यादी प्रसिद्ध केली आहे. १०४ विधानसभा मतदार संघात तयारी करा, अशा सूचना त्यांनी पक्षातील कार्यकर्त्यांना केल्या आहेत. यामुळे राज्यातील अनेक ठिकाणी महादेव जानकर यांच्या पक्ष आणि महायुती आमने-सामने येणार आहे. या लढतीला मैत्रीपूर्ण लढत असे नाव दिले जाणार की विरोधक म्हणून रासप निवडणूक लढवणार का?, हे येत्या काळात पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.


## संपादकीय....

# 'आबादी' आबाद?

जातींच्या लोकसंख्येचे प्रमाण हा वाढीव आरक्षणाचा निकष होऊ शकत नाही, असे सांगणाऱ्या निकालाचा परिणाम पुढल्या राजकारणावरही होऊ शकतो महाराष्ट्रात गेल्या आठवड्यात आरक्षण घेण्यासाठी अथवा वाचवण्यासाठी झालेली उपोषणे आणि त्याभोवतीचे राजकारण गाजत असताना याच विषयाशी संबंधित अशी घडामोड बिहारमध्ये गेल्या गुरुवारी घडली, तीकडे कोणाचे लक्ष गेले नाही. किंवा दुर्लक्ष करण्यात सारे यशस्वी झाले. सामाजिक-शैक्षणिक मागास वर्गांच्या आरक्षणाची मर्यादा कोणत्याही परिस्थितीत ५० टक्क्यांहून जास्त असता नये, हा १९९२ पासून आजतागायतच्या न्यायालयीन निकालांचा शिरस्ता बिहारमध्येही कायम राहील, असे पाटणा उच्च न्यायालयाने बजावले. तेथील वाढीव आरक्षण बेकायदा ठरले. यापूर्वी महाराष्ट्राची वाढीव आरक्षणाची मागणी नाकारताना सर्वोच्च न्यायालयाने हेच सुनावले होते. तरीही बिहारचा निकाल नेहमीचाच म्हणून सोडून देता येणारा नाही. उलट तो आरक्षणाबाबतच्या राजकीय भूमिकांवरही परिणाम करणारा आहे. बिहार राज्याने गेल्या वर्षी जात-गणना केली. या आकड्यांच्या आधारे बिहारने आरक्षणमर्यादा ६५ टक्क्यांपर्यंत वाढवली होती. हा निर्णय घटनाविरोधी ठरवताना पाटणा उच्च न्यायालयाने, जातींच्या लोकसंख्येचे प्रमाण हा आरक्षणाचा निकष होऊ शकत नाही, असा दंडकही घालून दिला. तो महत्त्वाचा. कारण त्याचा परिणाम पुढल्या वाटचालीवर होणार आहे. 'जितनी आबादी उतना हक' – म्हणजे ज्यांची जितकी लोकसंख्या तितका तरी त्यांचा हक्क– ही काँग्रेसनेते राहुल गांधी यांची निवडणूकपूर्व घोषणा होती. काँग्रेसच्या जाहीरनाम्यातही तिचे प्रतिबिंब दिसले. आमची सत्ता आल्यास जातगणना करू, असे आश्वासन 'इंडिया' आघाडीतील अनेक पक्षांनी दिले. परंतु या जातवार जनगणनेच्या आधारे सरकार आरक्षण वाढवू शकत नाही, असे आता पाटणा उच्च न्यायालय म्हणते आहे. या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान कोण देणार, हा प्रश्न. बिहारमध्ये जातवारीचे हे सर्वेक्षण झाले तेव्हा नितीशकुमार 'इंडिया' आघाडीत होते. किंबहुना 'जितनी आबादी उतना हक'ची प्रयोगशाळा म्हणूनच बिहारकडे पाहिले जात होते. समानतेचा पुळका असल्याचे दाखवणाऱ्या काही संघटनांनी या बिहारी जातगणनेला स्थगिती मागण्यासाठी उच्च न्यायालय गाठले, ही गणना बेकायदा ठरवण्यासाठी याचिका केली. पण तेव्हा पाटणा उच्च न्यायालयाने जातवार सर्वेक्षण वैध ठरवले आणि राष्ट्रीय जनता दलाचे तेजस्वी यादव यांची साथ घेणाऱ्या मुख्यमंत्री नितीशकुमारांनी त्याआधारे आरक्षण वाढवलेसुद्धा. पण जानेवारीअखेर नितीशकुमार पलटले आणि 'इंडिया' आघाडी सोडून 'एनडीए'त गेले. त्यामुळे आता या निर्णयाला कोणत्या तोंडाने आव्हान द्यायचे, असे कानकोंडेपण नितीश यांना आले असल्यास नवल नाही. या बाबतीत केंद्र सरकार नितीश यांना वाऱ्यावर सोडेल, हे उघड आहे. याचे कारण केंद्रातील सत्ताधाऱ्यांना जर अशा वाढीव आरक्षणाच्या निर्णयांच्या पाठीशी उभे राहायचे असते, तर महाराष्ट्राचा निर्णय केंद्राने वाऱ्यावर का सोडून दिला असता? बिहारमधील जातनिहाय जनगणनेच्या विरोधात केंद्र सरकारने आधी सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. पण नंतर केंद्राने भूमिका बदलली आणि 'आम्ही विरोध करत नाही पण पाठिंबाही देत नाही' असे स्पष्ट करण्याची पाळी महान्यायअभिकर्ता तुषार मेहता यांच्यावर आली. जातनिहाय जनगणनेची मागणी होत असली तरी अजून केंद्राने जनगणना कधी करणार हे स्पष्ट केलेले नाही. २०२१ मध्ये होणारी जनगणना करोनाच्या साथीमुळे पुढे ढकलण्यात आली. त्यानंतर सारे व्यवहार सुरळीत झाले पण जनगणनेबाबत केंद्राने काहीच भूमिका स्पष्ट केली नाही. लवकरच जनगणना करू, असे मोघम उत्तर संसदेत दिले होते. २०२४चे निम्मे वर्ष गेले तरी केंद्राकडून जनगणनेबाबत अद्याप काहीच हालचाल नाही. निवडणुकीनंतर जनगणना केली जाईल, असे उत्तर यापूर्वी देण्यात आले होते. जनगणनेबरोबरच जातनिहाय जनगणनेची मागणी होणार हे बहुधा केंद्र सरकारसाठी अवघड जागेचे दुखणे ठरू शकते. जे सत्ताधारी साध्या जनगणनेबाबतही काही बोलत नाहीत, ते प्रमाणशीर आरक्षणाला राजी कसे काय होतील? अर्थात, लोकसंख्या-आधारित राखीव जागांचा युक्तिवाद आता उच्च न्यायालयानेही धुडकावला हे बरेच झाले. पण लोकसंख्याधारित प्रतिनिधित्वाला खरोखरच आपला विरोध आहे का, हेही एकदा सत्ताधाऱ्यांनी तपासून पाहावे. कारण हाच प्रश्न २०२६ नंतरच्या मतदारसंघ फेररचनेच्या वेळी पुन्हा फणा वर काढू शकतो आणि दक्षिणेकडील राज्ये त्या वेळी विरोधी मुद्दे मांडू शकतात. ती दूरची बाब. पण तातडीने केंद्रातील सत्ताधाऱ्यांनी ज्याकडे पाहावे असा प्रश्न म्हणजे वाढीव आरक्षणाच्या मागण्यांचा.

तो राज्याराज्यांत आहे. गुजरातमध्ये पटेल समाजाच्या आरक्षणाला न्यायालयाने चाप लावला. परंतु आंध्र प्रदेशातील कप्पू किंवा उत्तरेतील जाट समाजाच्या आरक्षणाचा तिढाही असाच कायम आहे. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावणार नाही, असे राज्य सरकार म्हणत असले तरी केंद्र सरकार गप्प आहे. ओबीसी जाती हा भाजपचा गड मानला जातो. पण मतांचे राजकारण डोळ्यासमोर ठेवून अनेक पक्ष मध्यम शेतकरी जातींना आरक्षणाचे मधाचे बोट लावतात. २० ते २५ टक्के लोकसंख्या असलेल्या जाती किंवा समाजांना दुखावणे सत्ताधाऱ्यांना कठीण जाते. न्यायालयात फैसला झाला तरी मार्ग काढू म्हणून चाचपणी सुरू होते. तीन वर्षांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने मराठा समाजाला लागू करण्यात आलेले आरक्षण ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडण्यात आल्याच्या मुद्द्यावर रद्दबातल ठरविले होते. मराठा आरक्षणासाठी पुन्हा आंदोलन सुरू होताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरकारने मराठा समाजाला १० टक्के आरक्षण लागू करण्याचा नव्याने कायदा केला. या कायद्यालाही न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. मराठा आरक्षण कायद्याच्या कसोटीवर टिकण्याचे मोठे आव्हान असल्यानेच आता मराठा समाजाला ओबीसी समाजात आरक्षण मिळावे ही मागणी पुढे रेटण्यात येऊ लागली. वास्तविक मराठा आरक्षणावरून सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्र सरकारला एकदा ठेच लागूनही त्यातून काही बोध सत्ताधाऱ्यांनी घेतलेला दिसत नाही.मराठा, पटेल काय किंवा बिहारमधील दुर्बल घटकांचे वाढीव आरक्षण रद्द होण्याचे कारण एकच होते. सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केलेली आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा राज्यांनी ओलांडली आहे. तीन दशकांपूर्वी इंद्रा सहानी विरुद्ध भारत सरकार खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने नऊ न्यायमूर्तींच्या घटनापीठाने आरक्षणासाठी ५० टक्क्यांची मर्यादा निश्चित केली होती. या मर्यादेचा भंग करण्यात आल्यानेच ही नामुष्की विविध राज्यांवर आली.

# इतिहास शिक्षक म्हणून माझी भूमिका




प्रा. उपिंदर सिंग या इतिहासाच्या अभ्यासक आणि प्राचीन भारताविषयीच्या विविध पुस्तकांच्या लेखिका. त्यांनी इतिहासाबद्दल नुकतंच केलेलं हे प्रकट चिंतन– विशेषतः 'एनसीईआरटी'च्या पाठ्यपुस्तकांमुळे इतिहास–पुनर्लेखनाचा वाद पुन्हा उफाळला असताना आवर्जून वाचण्याजोगं 'संत नामदेव पुरस्कार' हा महाराष्ट्र आणि पंजाब यांना जोडण्याचं कार्य करणाऱ्या व्यक्तीला पुण्यातील 'सरहद' या संस्थेतर्फे दिला जातो. यंदाचा हा पुरस्कार स्वीकारल्यानंतर प्राचीन भारताच्या ख्यातकीर्त अभ्यासक प्रा. उपिंदर सिंग यांनी श्रोत्यांसमोर मांडलेल्या चिंतनाचा संपादित अंश – '' मी आपल्यासमोर इतिहासाची शिक्षक म्हणून उभी आहे. हा सन्मान मी माझ्या व्यवसायाचा आणि अभ्यासकांचा आहे असं मानते. इतिहासाच्या शिक्षकाचा धर्म काय असावा याबाबत दोन कल्पना दिसतात. पहिली अशी की इतिहासाच्या शिक्षकानं परीक्षा पास करण्यासाठी मदत करावी. परीक्षा महत्त्वाच्याच असतात. पण एकूण आयुष्यात त्यांचं स्थान मर्यादित असतं. दुसरी अशी इतिहासाच्या शिक्षकानं आपल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अंगी असणाऱ्या क्षमतांचा पूर्ण विकास करायला बळ द्यायला हवं. या कल्पनेशी मी स्वतः सहमत आहे. इतिहास शिकवायला सुरुवात केल्यावर मी असं अनुभवलं की मुलांना इतिहास शिकण्यात रसच नव्हता. मग माझ्या लक्षात आलं की ही सगळीच मुलं पुढे जाऊन इतिहाससंशोधक होणार नव्हती. इतिहासाची प्राध्यापक म्हणून माझी जबाबदारी होती की या सगळ्यांना ज्यातून काही घेता येईल असा इतिहास शिकवायचा. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारायला हवेत, वेगवेगळ्या दिशांनी विचार करायला हवा. दुसऱ्याचा दृष्टिकोन समजून घ्यायला हवा आणि आपलं म्हणणं नीट लिहून काढायला हवं या दिशेनं मी प्रयत्न करत गेले. मला उत्तरं माहीत नव्हती तिथे मला माहीत नाही हे सांगायला मी लाजले नाही. मी शिकवत आणि शिकत गेले, तसतसं लक्षात आलं की लिहून ठेवलेले विचार हे अधिक काळ टिकून राहतात आणि जास्त प्रभावीपणे जास्त लोकांपर्यंत पोचतात. या विचारातूनच मी अश्मयुगापासून ते मध्ययुगीन भारताच्या इतिहासावरचं माझं पहिलं पुस्तक लिहिलं. मला पुरातत्त्वशास्त्र आणि इतिहासाचा मिलाफ साधणारं, दडपलेल्या लोकांच्या इतिहासावर प्रकाशझोत टाकणारं, धर्म, तत्त्वविचार, सौंदर्यशास्त्र यांचा विचार करणारं पुस्तक लिहायचं होतं. खरं तर प्राचीन भारतातले पुरातन अवशेष, शिलालेख, ग्रंथ ही तरुण विद्यार्थ्यांना आकर्षून घेऊ शकेल अशी सामग्री असतानाही प्राचीन भारताच्या इतिहासाची पुस्तकं इतकी रटाळ का असतात कुणास ठाऊक? नीट प्रयत्न केला तर प्राचीन भारतातल्या बहुविध पुराव्यांचा अर्थ लावताना समोर उभे ठाकणारे विविध पर्यायी अन्वयार्थ सहजपणे विद्यार्थ्यांसमोर मांडणं शक्य आहे. विद्यार्थ्यांना प्राचीन ग्रंथ, शिलालेख, कला यांचं जग दाखवलं तर नक्कीच रोमांचकारी वाटेल. इतिहासाच्या विषयातले विविध वादविवाद हे विद्यार्थ्यांना खुल्या मनानं अर्थ लावायला बळ देत असतात. त्यांच्या मनात प्रश्न उपस्थित करतात आणि त्यांना चिकित्सक पद्धतीने तथ्यांचा ऊहापोह करायला उद्युक्त करतात. कारण इतिहासाचा शोध ही न संपणारी प्रक्रिया आहे. माझा इतिहासाचा शोध माझ्यासाठी नवी क्षितिजं खुली करत गेला. मला जाणवलं की भारतीय उपखंडाचा अभ्यास करायचा असेल तर इथल्या वेगवेगळ्या प्रदेशांचा अभ्यास करायला हवा. भारतातले वेगवेगळे भाग आणि आशिया, आफ्रिका आणि इतर जागतिक समुदाय हे कसे जोडले गेले होते, त्यांच्यात देवाणघेवाण आणि नातीगोती कशी निर्माण होत गेली हे अभ्यासणं गरजेचं आहे. भारतीय संशोधकांना आंतरराष्ट्रीय पातळीवर नव्या ज्ञानाची निर्मिती करण्यात वाटा उचलायचा असेल तर त्यांनी या सगळ्यांचा अभ्यास करायला हवा. तरुणांनी निर्भयपणे स्वतंत्र आणि नवे प्रश्न विचारायचे, नवी तंत्रं शिकायची आणि नव्या पद्धती आत्मसात करायची गरज आहे. त्यांना इतिहासाच्या पद्धतिशास्त्राचं उत्तम प्रशिक्षण दिलं तर ते नवी उत्तरं शोधतील आणि नव्या वाटा निर्माण करतील. चांगला आणि वाईट इतिहास कसा वेगळा असतो, इतिहास आणि जाहिरातबाजीत कसा फरक असतो हे त्यांना समजेल. पण इतिहासकाराचा आणि शिक्षकाचा धर्म नवे विद्यार्थी घडवण्यातच कृतकृत्य होतो का? त्याव्यतिरिक्तच्या इतिहासात रस असणाऱ्या सर्वसामान्यांचं काय? आजकाल इंटरनेटवर इतिहास असल्याचा दावा करणाऱ्या अनेक गोष्टी सापडतात. त्यातला बहुतांश भाग हा धड इतिहास नसतोच. इतिहासकार नसणारी माणसं ते रचतात. त्यातला काही भाग बराही असतो. पण बहुतांश भागाला इतिहास म्हणता येत नाही. इतिहासात अनेकांना रस असतो, पण त्यांना खरा आणि खोटा इतिहास यांतला फरक माहीत नसतो. साध्यासुध्या गोष्टींमधले नायक आणि खलनायक यांच्या चित्रणालाच ते इतिहास मानून मोकळे होतात. इतिहासकारांनी इतिहास या विषयाची पद्धत आणि त्यातली गुंतागुंत ही सामान्य माणसांना समजावून सांगायला हवी. त्यांना याची जाणीव करून द्यायला हवी की गतकाळ हा गुंतागुंतीचा असतो आणि त्याला अनेक पदर असतात. शास्त्रीय इतिहास आणि कुणा एखाद्याचं मत यांतील फरक त्यांना समजावून द्यायला हवा. गतकाळाबद्दलची सगळीच विधानं ही वैधतेच्या दृष्टीनं सारखी नसतात हेही समजावून द्यायला हवं. काही अन्वयार्थ हे उत्तम पुरावे, त्यांचं विश्लेषण आणि योग्य प्रतिपादनाच्या आधारे भक्कम उभे असतात. आणि तसं नसणारे तकलादू अन्वयार्थदेखील असतात. पण जोवर इतिहासकार आपल्या शास्त्राच्या पद्धती, त्यातली मतमतांतरं ही स्पष्टपणे उलगडून दाखवत नाहीत, तोवर हे सगळं इतिहासाचं प्रशिक्षण नसणाऱ्या सामान्यांना आणि विद्यार्थ्यांना समजणारच नाही. याचाच अर्थ असा की, अधिकाधिक इतिहासकारांनी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचायला हवं. ते तसं पोहोचवायचं तर फक्त इंग्रजीत लिहून चालणार नाही. वेगवेगळ्या प्रादेशिक भाषांमधून हे करायला हवं. भाषांतरंही या बाबतीत महत्त्वाची ठरतात. या दृष्टीनं मी प्रयत्न करत आले आहे. माझी पुस्तकं स्थानिक इतिहासाशी निगडित आहेत. प्रशिक्षित इतिहासकारांबरोबरच सामान्य वाचकालाही रस वाटेल अशा विषयावरचं प्राचीन भारतातल्या राजकीय हिंसेवरचं पुस्तकही मी लिहिलंय. माझं 'प्राचीन भारत – विरोधाभासांची संस्कृती' हे पुस्तक मराठीत भाषांतरित झालंय. प्राचीन भारताबद्दलच्या गैरसमजांचं निराकरण करणारं हे पुस्तक पाच प्रमुख विरोधाभासांचा अभ्यास मांडतं. पहिला विरोधाभास म्हणजे प्राचीन भारतातल्या वास्तवातली विषमता आणि आध्यात्मिक पातळीवर मोक्षाच्या बाबतीत दर्शविली जाणारी समता. तर काम या भावनेचा एकीकडे केला जाणारा गौरव आणि दुसरीकडे विरक्तीचं गुणगान हा दुसरा विरोधाभास. तिसरं म्हणजे देवतांची पूजनीयता आणि स्त्रियांचा द्वेष या गोष्टींचं एकत्र नांदणं. चौथा विरोधाभास म्हणजे हिंसा आणि अहिंसेचं अस्तित्व आणि पाचवा म्हणजे धार्मिक मतमतांतरांची परंपरा आणि संघर्षाचीही परंपरा. हे विरोधाभास नाण्याच्या दोन बाजूंसारखे आपल्याला समजून घ्यायला हवेत. म्हणजे गेल्या अनेक शतकांत इतके बदल होऊनही बऱ्याच गोष्टी अजून तशाच का आहेत याचं उत्तर शोधता येतं. असं पाहिलं तर इतिहास आपल्याला एकीकडे उदोउदो आणि दुसरीकडे धिक्कार या द्वंद्वाच्या पलीकडे जाऊन विरोधाभासी संस्कृती समजून घेण्याचं बळ देतो. या पाच विरोधाभासांतल्या हिंसा आणि अहिंसेच्या उदाहरणापुरतं बोलायचं झालं तर बऱ्याच भारतीयांना असं वाटत असतं की आपल्या प्राचीन इतिहासाला अहिंसेची परंपरा आहे. पण साधं रोजचं वर्तमानपत्र वाचेल त्यालाही कळेल की हे खरं नाही. हा प्रश्न मला पडला की साध्या पाठ्यपुस्तकातदेखील इतक्या लढायांची वर्णनंच्या वर्णनं असतानाही आपल्या सर्वांना हेच कसं काय वाटत आलं की आपला इतिहास अहिंसेचा आहे. मग लक्षात आलं की अहिंसा ही आपल्या गतकाळाचं नव्हे, तर स्वातंत्र्याच्या चळवळीचं वैशिष्ट्य आहे. आणि हे वर्तमान आपल्या गतकाळाला रेखीव अशी मुरड घालत आलं आहे. जगातल्या इतर सर्व सत्तांसारख्याच भारतीय सत्तांनीदेखील समाजाला आदर्श रूप देण्याच्या नावाखाली शासन करणं आणि जनतेचे जीव घेणं अशा रूपातल्या हिंसेला वैध ठरवलं आहे. प्राचीन भारतीय ग्रंथ नीट वाचले तर लक्षात येतं की राजसत्तेचा विस्तार आणि प्रभाव वाढतो, तसतसं ती आपल्या हिंसेला रोजचं स्वरूप देते, पद्धतशीरपणे दिसेनाशी करते आणि तिला सुंदरशा स्वरूपात पेश करत जाते. हिंसा आणि हिंसेच्या धमक्या या सर्वच उतरंडीच्या व्यवस्थांमध्ये अनुस्यूत आहेत. प्राचीन भारतात या संदर्भात सामील असणाऱ्या व्यवस्था म्हणजे वर्ण, जाती, अस्पृश्यता, गुलामगिरी आणि पितृसत्ता. एकंदर प्राचीन भारत हा अहिंसेचा महामेरू असल्याचा विचार हा भूतकाळाच्या टप्प्यांवरून उड्या मारत मारत महावीर, बुद्ध, अशोक, आणि गांधींपर्यंत येतो. मधल्या विस्तृत हिंसक गतकाळाची तो दखल घेत नाही. याला चांगला इतिहास म्हणता येणार नाही. पण प्राचीन भारत हा संपूर्णतया अहिंसक नसला तरीही हिंसा आणि अहिंसा यांच्यातल्या तणावांचे दस्तऐवज मात्र प्राचीन राजकीय ग्रंथांमध्ये मुबलक प्रमाणात आढळतात हे त्याचं अनन्य असं वैशिष्ट्य आहे. जगात असं इतकं कुठेच आढळत नाही. महाभारत अहिंसा आणि नृशंसतेच्या अभावाची चर्चा करतं. पण राजसत्तेला काही प्रमाणात हिंसा गरजेची असल्याचंही मान्य करतं. जैन आणि बौद्ध धर्मातही असाच विचार आहे. अशोकानंही हिंसा आणि अहिंसेचा समतोल साधायचा प्रयत्न केला आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही राजानं दंडाचा उपयोग मर्यादित प्रमाणात करावा असं प्रतिपादन केलं आहे. एकूण हिंसा आणि अहिंसेच्या दुहेरी विचारांच्या सोबतीनं भारताचा वैचारिक इतिहास घडत गेला आहे. असंच इतर द्वंद्वांच्या सहअस्तित्वाबाबतही सांगता येतं. एकंदरीत, इतिहासाच्या अभ्यासकांनी समाजाच्या सोबत राहून, समाजातल्या विविध घटकांना जोडून घेत आणि सत्याची साथ न सोडता इतिहास लिहिला तर आपल्या इतिहासाविषयीची सामुदायिक समजूत निकोप राहील.

# शिंदे-फडणवीस सरकार आणि वन हक्काचे भिजत घोंगडे

जंगलांवर पारंपरिक हक्क आदिवासींचा हे मान्य करणारा वनहक्क कायदा झाला खरा, पण त्याच्या अंमलबजावणीत सरकारच इतके खोडे घालते की कायदा असूनही आदिवासींची परवड होते आहे. विशेष म्हणजे 'प्रगत' महाराष्ट्र इतर राज्यांच्या तुलनेत आदिवासींशी 'मागास' पद्धतीने वागतो आहे.

जयवंती घाटाळ ही एक सामान्य आदिवासी शेतकरी महिला. वीसेक वर्षांपूर्वी कोणी कसत नसलेल्या जागी नांगर फिरवून कष्टाने तिने पीक घ्यायला सुरुवात केली. दोन–चार वर्षांनी त्या कुटुंबाने तिथेच एक झोपडे बांधले. सरकारच्या लेखी ही वन जमीन होती. झोपडी बांधताना त्यांनी वनरक्षकाला विचारले, बांधू का झोपडी? तो म्हणाला छोटी बांधा. आणखी काही वर्षांनी छताला कौले टाकली. जोते वाढवले. पुरेसे घर बांधून झाले. काही वर्षांनी पुन्हा वनरक्षकाच्या तोंडी परवानगीवर विटांचे घर बांधले.

आपल्या देशात वनजमीन कसून पोट भरणारी किमान २३ लाख आदिवासी कुटुंबे आहेत. यातल्या बहुसंख्यांची गोष्ट जयवंतीसारखीच असते. २००८ पासून वन हक्क मान्यता कायदा लागू झाला आणि २००५ वा त्यापूर्वी ज्यांचा वनजमिनीवर कब्जा व शेती असेल त्यांना त्याचे हक्क देण्याची प्रक्रिया सुरू झाली. पण तरीही त्यानंतरही जयवंतीची परवड संपली नाही. तिने कच्च्या झोपडीच्या जागी पक्के घर बांधले म्हणून वनविभागाच्या उच्च अधिकाऱ्यांनी २०२० च्या जून महिन्यात ते पाडून टाकले. त्या विरोधात वयम् चळवळीने राज्यपाल आणि नंतर राष्ट्रीय जनजाती आयोगाकडे दाद–फिर्याद करून जयवंतीचा हक्क सिद्ध करून घेतला. पण तिच्या पाडलेल्या घराची कवडीमोलही भरपाई राज्य सरकारने दिली नाही.

रडीचा डाव अजूनही पक्का रस्ता नसलेल्या जिल्ह्यातल्या सोसोखेडा या आदिवासी गावाला सामूहिक वन हक्क मिळाले नाहीत. त्यांनी तेंदूपत्ता विक्री सुरू केली. चांगले उत्पन्न मिळू लागले. तीन वर्षे नीट चालले. या वर्षी त्यांचा तेंदूपत्त्याचा ट्रक वनविभागाने जप्त केला. त्यांनी राज्याच्या मुख्य सचिवांकडे तक्रार केली. आठवडाभर काही प्रतिसादच मिळाला नाही. तेंदूपत्ता सडला तर त्याला काहीच किंमत उरणार नाही म्हणून गावकरी अस्वस्थ झाले. खोज संस्थेने शासनाकडे पाठपुरावा करून तेंदूपत्ता सोडायला लावला. तेव्हा गाडी सोडणार नाही, फक्त पत्ता देतो अशी भूमिका वनविभागाने घेतली. मग माघार घेऊन पत्ता गाडीतून पाठवला, पण तो दुसऱ्याच गावात. हा रडीचा डाव कशासाठी?

दोन वर्षांपूर्वी नाशिक जिल्ह्यातल्या कोसवण गावाचा बांबूही असाच जप्त करून मग फक्त गाडी परत केली होती. लोकांनी स्वतंत्रपणे काही करायचे ठरवले, तर त्यांना मेटाकुटीला आणायचे हे शासनाचे ब्रीद आहे का? दोन वर्षांपूर्वी गडचिरोलीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी एका ग्रामसभेने ऑडिट केले नाही, म्हणून १३ ग्रामसभांची बँक खाती गोठवली. गावांना ना नोटीस दिली, ना बाजू मांडायची संधी. सरकार गावांना जे निधीचे तुकडे फेकते, त्याच्या दसपट या ग्रामसभांचे स्वतःचे उत्पन्न बांबू आणि तेंदू विक्रीतून होत होते. म्हणून साहेब–लोकांच्या पोटात दुखते का? गोंदिया जिल्ह्यात वनक्षेत्रातून विजेच्या उच्चदाबाच्या तारा जात होत्या. त्यासाठी जी भरपाई द्यावी लागते, ती वीज कंपनीकडून वनविभागाने घेऊन टाकली. प्रत्यक्षात हे वनक्षेत्र ग्रामसभांना सामूहिक वनहक्काखाली हस्तांतरित झाले होते. त्या वनांचे व्यवस्थापन व त्यातील उत्पन्नाचे सर्व अधिकार गावांचे होते. पण वनविभागाने भरपाई (एनपीव्ही) घेऊन परवानगी देऊन टाकली. बांधकाम सुरू झाले, तेव्हा गावकऱ्यांना कळले. त्यांनी आक्षेप घेऊन भरपाईची मागणी केली. ग्रामसभा व्हीएनसीएस संस्थेच्या मदतीने न्यायालयात गेल्या. न्यायालयाने ग्रामसभांना नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले. पण ही भरपाई गावांना आजही मिळालेली नाही.

वनक्षेत्रात वसलेल्या गावांना साध्या मानवी सोयीसुद्धा मिळत नसत. शाळा बांधायची किंवा रस्ता बांधायचा तरी केंद्र सरकारकडून वनसंवर्धन कायद्याखाली परवानगी आणा असे सांगितले जात असे. म्हणून वनहक्क कायद्यात सोपी तरतूद करण्यात आली आहे. गावाच्या गरजेच्या १३ सुविधांची त्यात यादी आहे. ग्रामसभेने ठराव केल्यानंतर या सुविधांचे बांधकाम करता येते. पालघर जिल्ह्यात कित्येक गावांचे रस्त्यांचे प्रस्ताव चार–पाच वर्षे रखडवल्यानंतरच वन विभागाकडून मान्य झाले आहेत. याउलट चंद्रपूर जिल्ह्यात याच तरतुदीखाली पेट्रोल पंप आणि दगडखदानीसाठी बिगरआदिवासी ठेकेदारांना जिल्हाधिकारी महोदयांनी तीन महिन्यांत तात्काळ परवानगी देऊन टाकली आहे. यासाठी ना ग्रामसभेचा ठराव होता ना कायद्यात बसत होते!



वनहक्कांचे अनिर्णित दावे महाराष्ट्रात २६ जिल्ह्यांत वनहक्काचे दावे आहेत. यांत १,९२,७०२ प्रलंबित किंवा निरस्त आहेत. १० जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी १० हजारांपेक्षा अधिक दावे प्रलंबित आहेत. जे दावे मान्य आहेत, त्यांच्यातही प्रत्यक्ष कब्जापेक्षा कमी क्षेत्र मान्य करून अंशतः अमान्य झालेल्या दाव्यांची मोठी संख्या आहे. दोन एकराच्या जागी १२ गुंठे सरकारने मान्य केले आणि हे दावे रिपोर्टमध्ये मान्य दाव्यात टाकून दिले. वयम् चळवळीने कमी क्षेत्राच्या मुद्द्यावरून पालघर जिल्ह्यात दाखल केलेल्या अपिलांची संख्याच चार हजार आहे. ही अपिले गेली सहा वर्षे अनिर्णित आहेत. यासाठी अनेकदा मोर्चे–धरणे देऊनही सरकारने कृती केलेली नाही.

सर्वोच्च न्यायालयात वाइल्डलाइफ फर्स्ट वि. केंद्र सरकार या खटल्यात राज्य शासनाने सांगितले होते की 'राज्यात किमान २२ हजार प्रकरणे चुकून निरस्त (अमान्य) झालेली आहेत. त्यांचा पुनर्निर्णय करायला न्यायालयाने वेळ द्यावा'. राज्य शासनातर्फे चुकून निरस्त प्रकरणांचे जे सर्वेक्षण झाले, ते करणाऱ्या पथकाला अशी ४४ हजार प्रकरणे सापडली. मात्र आपल्या अधिकाऱ्यांच्या चुकांवर पांघरूण घालणे सरकारने पसंत केले. २०१९ साली प्रतिज्ञापत्र दिल्यापासून अद्याप सरकारने निरस्त प्रकरणांबाबत काहीही केलेले नाही.

काहीच घडत नाही राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या बैठकीत प्रस्तुत लेखकाने मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. जिल्हा समिती म्हणते की निर्णय चुकीचा असला तरी आम्ही पुनर्निरीक्षण करणार नाही. पण असे केले तर अन्याय दुरुस्त होणारच नाही. यावर फडणवीसांनी सांगितले की जिल्हा समित्यांना आम्ही पुनर्निरीक्षणाचे आदेश देऊ. ही बैठक झाली ११ ऑक्टोबरला. अद्याप पालघर–नाशिक–नंदुरबार यांपैकी कुठेही पुनर्निरीक्षणाला सुरुवात झालेली नाही.

याच बैठकीत दुसरा मुद्दा होता वनहक्कधारक शेतकऱ्यांचे नाव सातबाऱ्यावर घेण्याचा. यासाठी महसूलमंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारने एक समिती मार्च २०२३ मध्ये गठित केली होती. तिच्या चार बैठका झाल्या. प्रस्तुत लेखकही या समितीत सदस्य आहे. समितीत वारंवार सांगूनही सचिव मंडळींनी या बाबतीत केंद्र सरकारकडून स्पष्टीकरण मागवण्याची सबब चालू ठेवली. वास्तविक केंद्र सरकारने ३ मार्च २०१४ रोजी जारी केलेल्या पत्रानुसार वनहक्कधारकांना इतर जमीनधारकांच्या समकक्ष नोंदवायचे आहे. महाराष्ट्राने मात्र वनहक्कधारकांना भोगवटादार म्हणून न नोंदवता इतर–हक्क म्हणून नोंदवले आहे. हा मुद्दा जनजाती सल्लागार परिषदेच्या बैठकीत लेखकाने उचलल्यावर व सदर दाखला दिल्यावर फडणवीस म्हणाले की, तसे असेल तर थांबायची गरज नाही. सातबाऱ्यावर भोगवटादार म्हणून नोंदणी सुरू करा. हे सांगूनही आता सहा महिने उलटून गेलेत. अजून काहीही कारवाई नाही. इतर हक्कात एकाच सातबाऱ्यावर १५०–२०० शेतकऱ्यांची नावे आहेत. यांची पीक–पाहणी कशी होणार, पीक विमा कसा मिळणार, एखाद्या विहिरीसाठी ते इतरांची ना–हरकत कशी घेणार, भूसंपादनात नमुना आठवर यांचे नावच नसले, तर पदरी काय पडणार?

छत्तीसगडमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी मिशन–मोडमध्ये स्वतः पुढाकार घेऊन वनहक्काबाबत राज्याला सातव्या क्रमांकावरून पहिल्या क्रमांकावर नेले होते. मध्य प्रदेशात तत्कालीन मुख्यमंत्री शिवराज सिंह यांनी पुढाकार घेऊन पेसा–वनाधिकार टास्क फोर्स तयार केला आणि वेगाने अंमलबजावणी केली. लोकसभा निवडणुकीत तेथील सर्व अ.ज.जा. राखीव जागांवर भाजप जिंकला आहे. महाराष्ट्रात चारपैकी एकच अ.ज.जा. राखीव जागा भाजपकडे राहिली आहे. निवडणुकीनंतर तरी काही नेते आत्मपरीक्षण करतात म्हणे. महाराष्ट्रात विधानसभेला चारच महिने शिल्लक असताना काही उजेड पडतो का पाहायचे.

# भा.बौ. महासभा शाखा : जुईनगर येथे ज्येष्ठ पौर्णिमा आणि राजर्षी छ. शाहूजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी







> आजचा तरुण हा फुले, शाहू, आंबेडकर चळवळी पासून दुर जात आहे, तो नको त्या ठिकाणी भरकटला जातो आहे. अशा तरूणांना कार्य करण्याची संधी उपलब्ध करून द्या. तो नक्कीच आपल्या कार्याचा ठसा उमटवेल..!
> अँड. नवीन प्रतापे

नवी मुंबई / के. एच. हनवते :– जुईनगर येथील मुलगंधकुटी बुद्ध विहार नवी मुंबई दिनांक : २२ जुन रोजी दि. बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडीया अर्थात भारतीय बौद्ध महासभा शाखा : जुईनगर यांच्या वतीने जेष्ठ पौर्णिमा आणि लोक कल्याणकारी राजा राजर्षी छ. शाहुजी महाराज यांचा जयंती जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात अला. या कार्यक्रमाचे प्रमुख प्रवक्ते : अँड. नवीन प्रतापे होते विषय:– राजर्षी छ. शाहू महाराजांचे जीवनकार्य या विषयावर अँड. नवीन प्रतापे यांनी खूप छान विषय मांडला. ते म्हणालेकी छ. शाहू महाराज यांचे जीवनकार्य हे प्रत्येक फुले, शाहु, आंबेडकर विचधारा मानणाऱ्या लोकांनी चळवळ समजुन घेतली पाहीजे, व तरूणांना प्रत्येक क्षेत्रात वाव दिला पाहीजे. कारण आजचा तरूण हा भरकटला जात आहे नको त्याच्या नादाला लागून आपला वेळ वेरथ घालवत आहे अशा तरूणांना माझे एवढेच सांगणे आहे की, केवळ जयंतीत अंदाधुंद होऊन चालणार नाही तर आंबेडकरी तरुणांनी अता हि फुले, शाहू, आंबेडकर चळवळ हतात घेतली पाहीजे व जोमाने जे शक्य होईल तेवढे फिल्डवर्क कार्य करा समाज नक्कीच तुमची दखल घेईल..! राजर्षी छ. शाहू महाराजांनी आयुष्यभर आपल्या गोरगरिबांच्या हितार्थ महान कार्य केले हे अगदी थोडक्यात पण समजेल अशा भाषेत अँड. नवीन प्रतापे (बिआरएसपी) नवी मुंबई जिल्हाध्यक्ष यांनी कमी वेळेमध्ये चांगलेच समजुन सांगण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या भाषणाला अनुमोदन देताना शाखेचे अध्यक्ष : बी सी सोनावले (गुरुजी) यांनी त्यांच्या प्रवचनाला अनुमत दिले आणि सर्वांना पौर्णिमेच्या शुभेच्छा देऊन पुढच्या महिन्यामध्ये वर्षवास सुरू होत आहे. कोणी वर्षावास घ्यायचा असेल त्यांनी नावाची नोंदणी करावी असे आव्हान केले.

त्याचप्रमाणे जे अदिक्षित बौध्द आहेत त्या बांधवांनी दीक्षा घ्यावी हेही कळविण्यात आले. त्याचप्रमाणे लवकरच वधु – वर सुचक केंद्र शाखेतर्फे चालू करण्याचे नियोजन आहे. त्याकरिता मुला–मुलींची स्थळे (बायोडेटा) पाठवावा असे आव्हान केले. शेवटी सर्वांना पौर्णिमेच्या शुभेच्छा देऊन सरणंतय घेऊन कार्यक्रमाची सांगता केली. आजच्या कार्यक्रमाचे धम्म दान दाते आयुष्मानिनी:– सत्वशीला भीमराव काळे (कॅशियर कृष्णा बँक कराड) ह्या होत्या.

त्यांच्या परिवारांना सर्व संघाने आशीर्वाद दिला. या कार्यक्रमासाठी सामाजिक व वरिष्ठ कार्यकर्ते : युवराज खरात, तसेच भारतीय बौद्ध महासभा आयु. चंद्रकांत माने (गुरूजी), अढाव (गुरूजी), केदार (गुरूजी), बौध्दाचार्य : कल्याणराव हनवते, नेरूळ येथुन शिवसरण (सर), केंद्रीय शिक्षीका : अलकाताई अढाव, अँड. जानकी आनंद, चंदनशिवे ताई, कवीता कांबळे, दया झेंडे, वर्षा साखरे, इत्यादी महिला, लहान थोर बालक, बालीका यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## किनवट तालुक्यातील कर्मचारी वर्गाकडून केवळ शासकीय सोपस्कार ग्रामपंचायतीतील विषय समित्या निव्वळ नावापुरत्याच




किनवट/शेख शौकत :–महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ४९ व ५० अन्वये ग्रामपंचायतींमध्ये विकासासाठी समित्या व लाभार्थी स्तरावर उपसमिती स्थापन केलेल्या असतात. गावाच्या विकासात्मक कामात लोकांच्या निर्णयाचा सहभाग असावा, या उद्देशाने ग्रामपंचायत सदस्यांसाठी विविध विषय समित्या कार्यान्वित केल्या जातात; परंतु, तालुक्यातील एकूण ग्रामपंचायतींपैकी काही समित्यांचा अपवाद वगळता बहुतांश समित्यांची कामे निव्वळ कागदावरच असल्याचे चित्र आहे. किनवट तालुक्यात १९१ महसुली गावे असून, १०७ वाडी व तांडे आहेत. यातील १० गावे बेचिराख असून, उर्वरित सर्व गाांचा कारभार एकूण १३४ ग्राम पंचायतीकडून पाहिल्या जातो. ग्राम पंचायत कर्मचारी वर्गाकडून फक्त शासकीय सोपस्कार म्हणून कागदावरच समित्या बनविण्यात आल्याचा प्रकार तालुक्यातील बहुतांशी ग्रामपंचायतींमध्ये पाहावयास मिळत आहे. याकडे शासन व प्रशासनाचेही दुर्लक्ष होत असल्याने समित्यांचा उद्देश तसा चांगला, पण त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी नाही अशी ओरड विविध गावातील सुजान नागरिकांकडून केली जाते. यासोबतच लोकनियुक्त सदस्यही बऱ्याचदा ग्रामपंचायतीला मिळालेल्या अधिकाराबाबत, ग्राम पंचायतच्या कार्यकलापाबद्दल आणि सोबतच आपल्या अधिकारांबाबतही उदासीन असतात. त्यासाठी शासनाकडून पूर्वी वेळोवेळी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करून, त्यांच्या कार्याची जाणीव करून देण्याचे काम केल्या जात होते. परंतु, अलीकडे तशी प्रशिक्षण शिबिरे बंद झाली आहेत, असे समजते. तसेच शासनाकडून जी काही प्रशिक्षण शिबिरे घेतली जातात, ती विशिष्ट कालमर्यादित असल्याने एका दिवसात किती सदस्यांना आपले अधिकार व कर्तव्या बाबतची नीट माहिती मिळेल असाही प्रश्न अनेकवेळा उपस्थित केला गेला आहे. गावातील नागरिकांची जबाबदारी आणि विश्वासातील संस्था म्हणून ग्रामपंचायतीकडे पाहिले जाते. ग्रामपंचायतींना विविध जबाबदाऱ्या व अधिकार दिलेले आहेत. सरपंच, उपसरपंच आणि सदस्यांच्या विविध समित्या स्थापन करून त्यांची कार्य निश्चित केली आहेत. ग्रामपंचायतमधील विविध समित्यांमध्ये महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती, संयुक्त वनव्यवस्थापन समिती, शालेय व्यवस्थापन समिती, ग्रामआरोग्य पोषण व पाणीपुरवठा स्वच्छता समिती, बालविवाह प्रतिबंधक कायदा समिती, आपत्ती व्यवस्थापन समिती, कर आकारणी समिती, जन्म–मृत्यू नोंदणी समिती, ग्राम बाल संरक्षण समिती, लाभार्थी स्तर उपसमिती, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान समिती, ग्राम दक्षता समिती, पाणंद रस्ता समिती, समिती (स्वस्त धान्य दुकान), जैविक विविधता समिती, 'जीपीडीपी' ग्रामसंसाधन गट समिती, स्वच्छ भारत मिशन निगर पाणलोट विकास समिती, मोकाट जनावरे देखरेख समिती, अन्न धान्य वितरण समिती, संयुक्त पर्यावरण समिती अशा २० समित्या असून ग्रामविकास समितीच्या सदस्यांपैकी एक तृतीयांशपेक्षा कमीत–कमी इतके सदस्य पंचायतीच्या सदस्यांमधील असतात.

या समित्यांचा कालावधी ग्रामपंचायतीच्या मुदती एवढेच असते. ग्रामविकास समितीतील सदस्यांची संख्या १२ पेक्षा कमी व २४ पेक्षा जास्त नसावीत, असे निर्देश आहेत. अशा विविध समित्या ग्रामपंचायतीमध्ये निर्माण करण्याचा उद्देश लोकहिताचाच असून, गावातील मूलभूत कामकाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे कार्य ते करू शकतात. समित्या आहेत नामधारी दुर्दैवाने, या समित्या फक्त नामधारीच असल्याचे दिसून येत आहे. अनेक ग्रामपंचायतीत या समित्यांची बैठकच आयोजित केली गेली नसल्याची गंभीर बाब उजेडात आली आहे. परिणामी, या समित्यांचा गावविकासाला हातभार लागल्याचे दिसून येत नाही. शासन व प्रशासनाच्या अशा दुर्लक्षित धोरणामुळे, अनेक ठिकाणी या समित्या केवळ ग्रामपंचायतीच्या दप्तरामध्येच स्थापन असल्याचे चित्र दिसून येत असून गावस्तरावरची विकास कामे खोळंबली आहेत. त्यामुळे ग्रामस्थांना त्याचा त्रास होतो आहे.

## वयाच्या पंचविशीनंतर दुधात पाणी मिसळून का प्यावे? तज्ज्ञांनी केला खुलासा

तुम्ही तरुण असताना सहज दुर्लक्ष करू शकता अशा निरोगी सवयी तुम्ही वाढत्या वयानुसार स्वीकारल्या पाहिजेत. आपल्या सर्वांना चांगला आहार आणि नियमित व्यायामाचे महत्त्व माहीत आहे. परंतु, काही तज्ज्ञांच्या मते आपण सामान्य दुधाऐवजी पाणी मिसळलेले दूध पिण्याचा विचार केला पाहिजे, हे तुम्हाला माहिती आहे का? पोषणतज्ज्ञ आणि आहारतज्ज्ञ, अदीबा इक्कराम सैय्यद यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला आहे ज्यात नमूद केले आहे की, २० किंवा २५ वर्षे वयापर्यंत दूध प्या. त्यानंतर दूध पिऊ नका, त्यात पाणी मिसळून मग प्यायले पाहिजे. आता प्रश्न असा पडतो की, हे योग्य आहे का? याबाबत द इंडियन एक्स्प्रेला सविस्तर माहिती देताना इंसिड्स फार्म येथील मार्केटिंगचे व्हीपी, तमल चॅटर्जी म्हणाले, आहारच्या सवयी, जीवनशैली आणि अनेक स्त्रोतांकडून पोषण आहार घेतल्याने दुधावरील अवलंबित्व कमी होऊ शकते. दूधात पाणी मिसळल्याने संवेदनशीलता असलेल्यांना पचायला सोपे जाते. दूधात पाणी मिसळल्याने त्याच्या पौष्टिक मूल्यावर कसा परिणाम होतो? दूधात पाणी मिसळल्याने प्रामुख्याने कॅलरी, फॅट्स, प्रथिने आणि कॅल्शियम प्रति सर्व्हिंगच्या प्रमाणावर परिणाम होतो. स्निग्ध पदार्थांचे प्रमाण कमी झाल्यास काही जीवनसत्त्वांच्या सेवनावर पाणी मिसळण्याचा थोडासा परिणाम होऊ शकतो, परंतु दुधाच्या पौष्टिक मूल्यावर एकंदरीत परिणाम साधारणपणे माफक असतो, असे चॅटर्जी यांनी स्पष्ट केले. दुधामध्ये पाणी मिसळल्यानंतरही व्यक्ती संतुलित आहार घेऊन त्यांच्या पौष्टिक गरजा पूर्ण करत आहेत हे सुनिश्चित करणे अत्यावश्यक आहे, असे चॅटर्जी यांनी सांगितले आहे. दुधात पाणी मिसळल्याने कॅल्शियमचे शोषण आणि हाडांच्या आरोग्यावर कसा परिणाम होतो? दुधात पाणी मिसळल्याने कॅल्शियमचे शोषण थेट बिघडत नाही, त्यामुळे कॅल्शियमचे सेवन कमी होऊ शकते. चॅटर्जी यांनी सुचविले की, हाडांच्या आरोग्यास समर्थन देण्यासाठी व्यक्तींनी त्यांच्या कॅल्शियमच्या गरजा संतुलित आहाराद्वारे पूर्ण केल्या आहेत याची खात्री करणे आवश्यक आहे; ज्यात कॅल्शियम समृद्ध अन्नाचे इतर स्त्रोत समाविष्ट आहेत, जसे की, हिरव्या भाज्या आणि आवश्यक असल्यास पूरक आहार घेऊ शकता. दीर्घकालीन आरोग्य स्थिती असलेल्या व्यक्तींच्या आहारात पाणी मिसळलेले दूध कसे फायदेशीर ठरते? मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा हृदयविकार यांसारख्या दीर्घकालीन स्थिती असलेल्या व्यक्तींसाठी पाणी मिसळलेले दूध त्यांच्या आहारातील गरजा पूर्ण करण्यासाठी कमी–कॅलरी, कमी–सोडियम आणि कमी–सॅच्युरेटेड फॅट्सचा पर्याय देऊ शकते, असे चॅटर्जी यांनी नमूद केले. चॅटर्जी म्हणाले की, कमी फॅट्सयुक्त निवडा आणि त्यात पाणी मिसळल्याने कॅल्शियम आणि पोटॅशियमसारख्या आवश्यक पोषक तत्वांचा पुरवठा करताना रक्तातील साखर, रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित करण्यात मदत होऊ शकते. पण, पाणी मिसळलेले दूध त्यांच्या एकूण आहार योजनेत उपयुक्त ठरते का याची खात्री करण्यासाठी व्यक्तींनी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

## विद्यार्थ्यांचे शिक्षण देश विकासासाठी असावे– भिक्खू पय्यानंद थेरो





लातूर :– शिक्षण हा आत्मउन्नतीचा मार्ग आहे. शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. किंबहुना समाज व देशाची प्रगती होते. अध्ययन व अध्यापनाचा स्तर हा उच्च आणि प्रामाणिक असणे आवश्यक आहे. देशातील विध्यार्थ्यांनी शिक्षण घेताना स्व:कल्याणा सोबत देश विकासाचा दृष्टीने शिक्षण घ्यावे असे प्रतिपादन पू. भिक्खू पय्यानंद थेरो यांनी केले आहे. बौध्द धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट, रानेगऑन व प्रज्ञा महिला मंडळ, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने जेष्ठ पौर्णिमा, धम्मदेशना व गुणवंत विध्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन नालंदा बुध्द विहार, प्रकाश नगर, लातूर येथे करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भिक्खू संघ व उपस्थितीतांच्या हस्ते पूजा, त्रीशरण पंचशील व बुध्द वंदनेने करण्यात आली. भारत देशाची प्रगती ही येणाऱ्या काळात तरुण युवा पिढीच्या हातात आहे. देशाच्या सर्वांगीण विकासाचा स्तर विध्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणामुळे वाढणार आहे. त्यासाठी आधुनिक काळातील शिक्षण पद्धती सरकारने मजबूत करायला हवी. त्याकरिता शासनाने तरुणांना प्रोत्साहन देणे काळाची गरज आहे. शिक्षणा शिवाय मनुष्य हा प्रगत होऊ शकत नाही. त्यामुळं सर्वांनी शिक्षण घ्यावे असेही भंतेजी म्हणाले.

यावेळी भन्ते बुध्दशील यांचीही धम्म देशना संपन्न झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. देवदत्त सावंत यांनी केले. याप्रसंगी इयत्ता दहावी व बारावीमध्ये प्रविण्य प्राप्त विद्यार्थी–विद्यार्थीनीचा सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रा. देवदत्त सावंत, प्रज्वल कटारे, पारमिता कालेकर, पृथ्वी सोनवणे, गीत गायकवाड, सम्यक कांबळे, विशाखा टोम्पे, सृष्टी साळवे, साक्षी गुळवे, बोधिराज कांबळे, नैतिक गायकवाड, संकेत कांबळे, नम्रता गायकवाड, रागिणी शेळके, तेजस्विनी वाघमारे, साक्षी वाघमारे, अपेक्षा कांबळे, शर्वरी वाघमारे, दिव्या डोंगरे, उर्वेला वाघमारे, यशराज गायकवाड, स्वयंम शृंगारे, कृष्णकांत सुरवसे इत्यादीचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अन्तेश्वर थोटे यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी मानले. या प्रसंगी शोभा सोनकांबळे, निर्मला थोटे, रेखा सुरवसे, पंचशीला बनसोडे, स्वाती सूर्यवंशी, प्रज्ञा महिला मंडळच्या सर्व सदस्या, गौतम सूर्यवंशी, माऊली सुरवसे, सत्यप्रकाश कांबळे, राजू सूर्यवंशी, राहुल शाक्यमुनी, पांडुरंग अंबुलगेकर, सतीश कांबळे, विशाल वाहुळे, निलेश बनसोडे आदिसह मोठ्या संख्येने उपासक उपासिका उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनिरुद्ध बनसोडे, करण ओव्हाळ, मिलिंद धावारे तसेच महाविहार धम्म संस्कार केंदद्राच्या सर्व धम्मसेवकांनी परिश्रम घेतले.

## आफ्रिकेत खातात 'डासांचा बर्गर'! आरोग्यासाठी कीटक किती फायदेशीर आहेत? जाणून घ्या तज्ज्ञांचे मत.



सध्या सोशल मीडियावर आफ्रिकेत डासांपासून तयार करून खाल्ल्या जाणाऱ्या बर्गरची तुफान चर्चा होत आहे. मात्र, या डासांनी तयार होणाऱ्या बर्गरवर इंटरनेटवर संमिश्र स्वरूपाच्या प्रतिक्रिया पाहायला मिळत आहेत. अनेकांना कोणत्याही प्रकारचे कीटक खाण्याची पद्धत ही प्रचंड किळसवाणी आणि विचित्र वाटत असली तरीही हा प्रकार आरोग्य आणि पर्यावरणासाठी फायदेशीर ठरू शकते, असे दी इंडियन एक्स्प्रेसच्या एका लेखावरून समजते. इन्स्टाग्राम या सोशल मीडियावरील अशोक नावाच्या कन्टेन्ट क्रिएटरने या आफ्रिकेतील डासांच्या बर्गरबद्दल माहिती देणारा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये अशोक म्हणतात, अलीकडेच व्हायरल झालेल्या एका व्हिडीओमध्ये आफ्रिकेतील लोक डासांपासून बनविलेला बर्गर खाताना दिसत आहेत. या बर्गरमधील एक पॅटी ही जवळपास सहा लाख डासांपासून बनवली जाते. पावसाळ्यात व्हिक्टोरिया तलावाजवळ पैदास होणाऱ्या डासांचा वापर यासाठी केला जातो.अनेकांना किडे खाण्याची ही कल्पना अतिशय किळसवाणी वाटू शकते आणि साहजिकच असे खाद्य खाणे आरोग्यासाठी योग्य नसल्याचेदेखील बहुतेकांचे मत असेल. मात्र, तुम्ही अगदी चुकीचा विचार करीत आहात. असे पुढे अशोक म्हणतात. मात्र, अशा प्रकारचे डास आणि किडे खाण्याबद्दल तज्ज्ञांचे काय मत आहे ते आपण जाणून घेऊ किडे–कीटक खाण्याबद्दल तज्ज्ञ काय म्हणतात? 'हंग्री कोआला' येथील वरिष्ठ आहारतज्ज्ञ इप्सिता चक्रवर्ती या अशोक यांच्या मताशी सहमत आहेत. कीटकांमध्ये मुबलक प्रमाणात पोषक घटक असतात. अनेकदा त्यांमधील प्रथिनांचे प्रमाण हे पारंपरिक मांसाहारातील प्रमाणापेक्षादेखील अधिक असते. कीटक हे उच्च गुणवत्ता असणाऱ्या प्रथिनांचे स्त्रोत असून, त्यांमध्ये शरीरास आवश्यक असणारे अमिनो ॲसिडदेखील उपलब्ध असते, असे त्या म्हणतात. आहारतज्ज्ञ चक्रवर्ती यांच्या मतानुसार, कीटकांमध्ये बी–१२ आणि रिबोफ्लेव्हिनसारखी विविध जीवनसत्त्वे, लोह, झिंक व मॅग्नेशियमसारखी आवश्यक खनिजे उपलब्ध असतात. काही कीटकांमध्ये ओमेगा ३ व ओमेगा ६ फॅटी ॲसिडसारखे घटकदेखील उपलब्ध असतात. इतकेच नव्हे, तर पचनशक्तीसाठी उपयुक्त असणारे काइटिन नामक फायबरसुद्धा कीटकांमध्ये सापडते, असे त्या म्हणतात.जागतिक पातळीवर कीटक खाण्याची संस्कृती कशी निर्माण झाली? एंटोमोफॅजी म्हणजेच किडे खाण्याची पद्धत ही आफ्रिका, आशिया, लॅटिन अमेरिकेमध्ये कित्येक वर्षांपासून अस्तित्वात आहे. मात्र, पाश्चिमात्य समाजाने या पद्धतीचा कायमच तिरस्कार केला आहे. परंतु, आता ही परिस्थिती बदलली असून, अनेक जण कीटकांकडे खाण्यास आरोग्यदायी आणि आहाराचा सस्टेनेबल स्त्रोत म्हणून पाहू लागले आहेत, असे चक्रवर्ती यांनी सांगितले आहे. कीटकांचे सेवन करणे ही सामान्य बाब असून, याबद्दल जनजागृती करण्यासाठी रूढी–परंपरा यांच्या बंधनांपलीकडे जाऊन आणि पाककलेच्या नवीन कल्पना महत्त्वपूर्ण ठरू शकतात. कीटकांच्या शेतीसह आहाराचे पर्यावरणाला होणारे फायदे कीटकांची शेती करणे हा पशुपालनापेक्षा कितीतरी पटींनी टिकाऊ सस्टेनेबल पर्याय आहे. कीटक, डुक्कर व गुरांच्या तुलनेत अतिशय कमी प्रमाणात हरितगृह वायू सरी निर्माण करतात; ज्यामुळे ते पर्यावरणास अनुकूल ठरून, प्रथिनांचे स्त्रोत म्हणून काम करू शकतात, असे चक्रवर्ती म्हणतात.दुसरे म्हणजे पारंपरिक पद्धतीत जनावरांना खाऊ घालण्याच्या तुलनेत, कीटकांना खाऊ घालण्याची आवश्यकता कमी असते. असे असले तरीही कीटकांमधून मुबलक प्रथिने मिळू शकतात. कीटक खाताना कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी? प्रत्येक खाद्यपदार्थाप्रमाणेच कीटक खातानाही सुरक्षितता महत्त्वाची आहे. बहुतांश कीटक कमी धोकादायक आणि खाण्यायोग्य असले तरीही काही विशिष्ट कीटकांच्या सेवनाने व्यक्तीला ॲलर्जीदेखील होऊ शकते, असे चक्रवर्ती म्हणतात. कीटकांची शेती ही अनियंत्रित वातावरणात केली जाते. त्यामुळे कीटकांमध्ये कीटकनाशके, जड धातू अथवा विविध दूषित पदार्थ असण्याची शक्यता असते. मात्र, यांसारख्या समस्या दूर करण्यासाठी नियमांचे काटेकोर पालन करून कीटकांची शेती करणे महत्त्वपूर्ण आहे, असे आहारतज्ज्ञ चक्रवर्ती यांचे म्हणणे आहे, अशी माहिती दी इंडियन एक्स्प्रेसच्या एका लेखावरून मिळते.

# राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त शाळा – महाविद्यालयात व्याख्याने आयोजित करावीत

## राजर्षी शाहू महाराज जयंती उत्सव समितीचे शिक्षण उपसंचालकांना निवेदन

लातूर : सामाजिक न्यायाचे प्रणेते राजर्षी शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंती निमित्त सर्व शाळा – महाविद्यालयातील नववी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवन कार्यावर व्याख्याने आयोजित करावीत, अशा मागणीचे निवेदन फुले –शाहू –आंबेडकर विचार मंच अंतर्गत राजर्षी शाहू महाराज जयंती उत्सव समिती लातूरच्या शिष्टमंडळाने आज २४ जून रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या दरम्यान शिक्षण उपसंचालकांना दिले आहे. सामाजिक न्यायाचे प्रणेते राजर्षी शाहू महाराज यांची १५० वी जयंती २६ जून रोजी महाराष्ट्रसह सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या दिवशी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येते. केवळ यामुळे त्यांच्या सामाजिक सुधारणाच्या विचारांना उजाळा मिळत नाही. म्हणून प्रत्येक शाळा, महाविद्यालयात ९ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी विचारसभा अर्थात व्याख्यानांचे आयोजन केल्यास



शाहू महाराजांच्या जीवन कार्याचा इतिहास उलगडला जाईल. आजच्या पीढिला शाहू महाराज कळतील. सदर व्याख्यानांना सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांला निमंत्रित करावे. याबाबतचे शिक्षण उपसंचालकांनी पत्रक काढून शाळा – महाविद्यालयाना तसें कळवण्यात यावे, अशी मागणी सदरच्या निवेदनात करण्यात आली आहे. निवेदन देणाऱ्या शिष्ट मंडळात राजर्षी शाहू महाराज जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. माधव गादेकर, सचिव राजकुमार होळीकर, प्रा. सुधीर अनवले, प्रकाश घादगीने, ॲड. शिरीष दहिवाल, कॉ. विश्वंभर भोसले, टी. एस. माने, पी. जी. भिसे, संजय कुंटेवाड, प्रा. बबन पवार, गणपत तेलंग, रामराव गवळी, गणपतराव पाटील, शेख शफी, आर. डी. गायकवाड, श्रावण मस्के आदीचा समावेश होता.

# प्रा. डॉ. विनोद शिंपले यांची स्पेन मध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सेमीनारसाठी निवड

कोल्हापूर : तडवळे गावचे सुपुत्र व सध्या कोल्हापूर येथील न्यू कॉलेजमध्ये कार्यरत असणारे प्राध्यापक व संशोधक डॉ. विनोद भीमराव शिंपले यांची जुलै २०२४ महिन्यामध्ये माद्रिद (स्पेन) येथे आयोजित आंतरराष्ट्रीय सेमिनारमध्ये ते सहभागी होण्यासाठी निवड झाली आहे. सदर परिषदेत डॉ शिंपले आपले भारतातील गारवेल कुळातील वनस्पतींची सद्यस्थिती व त्यांचे संवर्धन या विषयावरील आपले संशोधनपर व्याख्यान देणार आहेत. तसेच १४ ते १८ जुलै दरम्यान आयोजित वनस्पती नामकरण कार्यशाळेत आपला सहभाग नोंदवणार आहेत. त्याचप्रमाणे फ्रान्स येथे १९ ते २० जुलै रोजी आयोजित कॉन्फरन्स मध्येही आपला सहभाग नोंदविणार आहेत. फ्रान्स येथे जगभरातील गारवेल कुळातील वनस्पती संशोधकांची कॉन्फरन्स आयोजित केली आहे, यात डॉ. शिंपले आपले संशोधनपर विचार मांडणार आहेत. डॉ. शिंपले हे तडवळे गावचे सुपुत्र असून त्यांचे प्राथमिक शिक्षण जि प शाळेत झाले आहे. डॉ शिंपले यांनी यापूर्वीही आपले संशोधन चीन, रशिया, सिंगापूर, नेपाळ अशा विविध देशात विविध संशोधकासमोर मांडले आहे. डॉ. शिंपले यांनी आत्तापर्यंत पाच नवीन वनस्पतींचा शोध लावला असून त्यांचे एकूण ७५ संशोधन पेपर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांतून प्रकाशित झाले आहेत. त्यांनी एकूण १५ क्रमिक पुस्तकांचे लेखन केले आहे. सदर परिषदेसाठी उपस्थित राहण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन श्री. के. जी. पाटील यांचे सहकार्य लाभले. डॉ. शिंपले यांच्या सदर निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.



# छत्रपती शाहू महाराज युवा शक्ती करिअर शिबिरात युवक- युवतींचा उत्स्फूर्त सहभाग

## दहावी, बारावी नंतरच्या रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधीबाबत तज्ज्ञांनी केले मार्गदर्शन

लातूर :– भविष्यातील रोजगाराच्या संधींबाबत युवक–युवतींना मार्गदर्शन करण्यासाठी लातूर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने छत्रपती शाहू महाराज युवा शक्ती करिअर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात उत्स्फूर्त सहभाग नोंदविलेल्या अंदाजे अडीच हजार युवक–युवतींना विविध क्षेत्रातील तज्ज्ञ मान्यवरांनी मार्गदर्शन केले. राज्याचे कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती संभाजीनगर शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या उपस्थितीत या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी तथा लातूर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य कु. मनीषा बोरुळकर, कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त बालाजी मरे, आयएमसी ऑफ आयचे चेअरमन शिवानंद जवळे, दीपक गायकवाड, उपशिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, यावेळी उपस्थित होते.



इयत्ता दहावी, बारावी नंतरच्या करिअरच्या संधींची माहिती देण्यासाठी आयोजित छत्रपती शाहू महाराज युवा शक्ती करिअर शिबीर हा अतिशय चांगला उपक्रम आहे. या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना आपल्या भविष्यातील योग्य करिअरची दिशा निवडण्यासाठी मदत होईल, असे आमदार विक्रम काळे यांनी सांगितले. तसेच जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी त्यांच्या कौशल्य विकासाला प्राधान्य द्यावे.

विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून कठोर परिश्रमाची तयारी ठेवावी, ध्येय निश्चित मिळेल, असे आमदार श्री. काळे यांनी सांगितले. इयत्ता दहावी, बारावी नंतर काय करावे, हे ज्याला समजले तोच आयुष्यात यशस्वी होतो. या महत्त्वाच्या टप्प्यावर विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरचे ध्येय निश्चित करावे. तसेच आपण काय करायला हवे आणि काय करायला नको, हे समजून घ्यावे. आपल्या ध्येयाकडे आत्मविश्वासाने वाटचाल करावी, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी सांगितले. तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये विविध कौशल्ये शिकाबविली जात आहेत. त्यानुसार आपल्या क्षमता ओळखून प्रत्येकाने एकतरी कौशल्य आत्मसात करावे, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. प्रास्ताविक प्राचार्य कु. बोरुळकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरच्या दिशा निश्चित करून यश मिळविण्याबाबत छत्रपती शाहू महाराज युवा शक्ती करिअर शिबिरात मार्गदर्शन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. आमदार अभिमन्यू पवार यांनीही भ्रमणध्वनीद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बापूसाहेब शिंदे पाटील यांनी व्यक्तिमत्व विकास याविषयावर, तर प्रा. महेश मोरे यांनी स्पर्धा परीक्षा, डॉ. विकास कुलकर्णी यांनी चला उद्योजक बनू या विषयावर मार्गदर्शन केले. युवक–युवतींना रोजगार, स्वयंरोजगाराच्या शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी विविध शासकीय विभागांची दालने याठिकाणी उभारण्यात आली होती. सूत्रसंचालन पुरुषोत्तम माने आणि सचिन डोंगरे यांनी केले, आनंद शेंद्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# विजयनगर एसओएस च्या बाजूस असलेल्या दलित वस्तीच्या नागरी निवासी समस्या सोडवण्यासाठी मनपा समोर उपोषण आंदोलन सुरु !

लातूर :– लातूर शहराच्या पूर्व भागातील विजयनगर एसओएस जवळील दलित वसाहत असून म्हाडा अंतर्गत नगरपरिषद अस्तित्वात असताना घरे बांधून दिली होती. परंतु सहाच महिन्यामध्ये घराला तडे जाऊन काही घर पडायला सुरुवात झाली होती. ही बाब लातूर नगरपालिका, महानगरपालिका प्रशासनास जाणीव करून दिली होती.

अनेक वेळा लातूर महानगरपालिका प्रशासन, आयुक्त प्रशासक यांना निवेदन देऊन उपोषण केले. आजवर लातूर महानगरपालिका प्रशासनाला जाग न आल्याने आज दिनांक २४ ६ २०२४ रोजी लातूर महानगरपालिकेच्या समोर येथील नागरिकासमवेत उपोषण आंदोलन चालू करण्यात आले. विजयनगर येथील नागरी निवासी समस्या सोडण्याचे अनेक वेळा निवेदन आंदोलन करून मनपा प्रशासन, जिल्हाधिकारी, मुख्यमंत्री यांच्यापर्यंत निवेदन देऊन ही न्याय मिळाला नाही. लातूर मनपा प्रशासन हे स्ट्रक्चर ऑडिट आल्यानंतरच पूर्तता करू म्हणून टाळाटाळ करीत असले तरी शासनातर्फेच म्हाडा अंतर्गतच





विजयनगर मध्ये घरी बांधून देण्यात आले होते. पण ती पहिल्या पावसात पडझड होऊन निकृष्ट बांधकाम असल्याने ती आज घडीला मोडकळी झाल्याने न्याय मागणीसाठी सदरील उपोषण आंदोलन असून, आंदोलनात परमेश्वर भोसले, दीपक गायकवाड, शबरा काळे, जोंधळे अमित, राजू मस्के, सागर मिलिंद, उत्तम पांडुरंग, अनिता सुरवसे, हिराबाई घोडके, मुरा बाई शिंदे, नंदा ससाणे, हिराबाई खैरमोडे, अंजनाबाई शिरसाट, वर्षा होनमाने, शेषाबाई कांबळे, हौसाबाई माने, सुखामर कांबळे, कुसुंबा भुताळे, मसन चौधरी, छाया भोसले, विमल सासने, मुक्ताबाई मारुती, गायकवाड मायाबाई, पवार प्रतिमा, गायकवाड, लक्ष्मी माकने सहभागी झाले आहेत. उपोषण मागे घेण्याकरिता मनपा प्रशासनाच्या वतीने शहर नगर अभियंता एन के केंद्रे, प्रधानमंत्री, रमाई घरकुल आवास योजनेचे प्रमुख रुक्मानंद वडगावे यांनी उपोषणा स्थळी भेट देऊन उपोषण मागे घ्यावे यासाठी पत्र दिले होते. उपोषण कर्ते यांनी लगेच उपोषण मागे घेण्यात आले.

# नीट – २०२४ परीक्षांमध्ये अवैध रॅकेट चालविणाऱ्या ४ आरोपीं विरुद्ध गुन्हा दाखल

लातूर :– नीट – २०२४ परीक्षांमध्ये अवैध रॅकेट चालविणाऱ्या ४ आरोपीं विरुद्ध गुन्हा दाखल वैद्यकीय प्रवेश परीक्षा नीट–२०२४ परीक्षेतील उमेदवारांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या पैशाच्या मोबदल्यात अवैध मदत करण्याचे रॅकेट चालविणाऱ्या ४ आरोपीं विरुद्ध दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) नांदेड युनिट यांचे कडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दहशतवाद विरोधी पथक नांदेड युनिटमध्ये नेमणुकीस असलेले अवेज मकसूद अहमद काझी, पोलीस उपनिरीक्षक यांनी फिर्याद दिल्याने शिवाजीनगर पोलीस स्टेशन लातूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील संशयित हे गैरव्यवहाराचे माध्यमातून पैसे घेऊन परीक्षा पास करून देण्याचे रॅकेट चालवीत आहेत अशी गुप्त माहिती एटीएस मधील अधिकाऱ्यांना मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे एटीएसने यातील संशयित यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याचे मोबाईल फोन मध्ये नीट –२०२४ परीक्षे संदर्भात संशयित माहिती मिळून आली आहे. गुन्ह्याचे तपासात आरोपी नामे जलीलखा उमरखान पठाण यास अटक करण्यात आली असून इतर फरारी आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत. गुन्ह्याचा पुढील तपास श्री भागवत फुंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर हे करीत आहेत.

# गाळे धारकांवर मनपाची कार्यवाही. ०६ गाळे सील, तीन लाख रु वसुल केले

लातूर/प्रतिनिधी : – लातूर शहर महानगरपालिका मार्फत मनपा मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे भाडे वसुलीसाठी विशेष वसुली मोहिम सुरु करण्यात आली आहे. सदर वसुली मोहिम ही मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या आदेशान्व्ये सुरु करण्यात आली आहे. शनिवार दिनांक २२/०६/२०२४ रोजी गाळे धारकांवर धडक कार्यवाही करण्यात आली. सदर कार्यवाहीमध्ये ०६ गाळे सील केले आहे. व एकूण रक्कम रु ३५६२०१/– रु वसुली करण्यात आली आहे. सदर वसुली हि खालीलप्रमाणे व्यापारी संकुलामध्ये करण्यात आलेली आहे.

लातूर शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या गांधी मैदान सा.क्रं. १११ व ११२ व्यापारी संकुल येथील ०५ गाळे सील केले व १९२२४३/– रु नगदी वसुली करण्यायत आली आहे. तसेच सारोळा रोड व्यापारी संकुल येथील ०१ गाळा सील करण्यात आला आहे. व गांधी मार्केट येथील १६३९५८/– रु चे चेक प्राप्त झाले.

त्याअनुषंगाने लातूर शहरातील मनपा मालकीच्या गाळे धारकांना उपायुक्त, डॉ.पंजाब खानसोळे यांच्या व्दारे आवाहन करण्यात येते की ज्या गाळे धारकांकडे थकबाकी आहे अशा गाळे धारकांनी तात्काळ थकबाकीचा भरणा करुन मनपास सहकार्य करावे. व गाळे धारकांनी थकबाकी भरणा न केल्यास अशा गाळे धारकांवर अशीच कार्यवाही सुरु रहाणार आहे.



# 'बार्टी' मार्फत राबविण्यात येणार विविध स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण

पुणे / प्रतिनिधी :– डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या स्वायत्त संस्थेमार्फत सन २०२४–२५ या वर्षाकरीता विविध स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांना या संकेतस्थळावरुन दिलेल्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे दिनांक ३ जुलै पर्यंत अर्ज सादर करता येणार असून, विद्यार्थ्यांनी या स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण संधीचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांनी केले आहे. स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांच्या अंमलबजावणीकरीता महाराष्ट्र शासनामार्फत सामाजिक न्याय व विशेष विभागाच्या दिनांक ३० ऑक्टोबर २०२३ शासन निर्णयानुसार सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले. त्यानुसार बार्टी मार्फत केंद्रीय लोकसेवा आयोग–नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण, महाराष्ट्र लोकसेवा आयोग–राज्यसेवा परीक्षा, अभियांत्रिकी सेवा परीक्षा व न्यायिक सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण तसेच बँकिंग, रेल्वे. एलआयसी, इ. व तत्सम परीक्षा पूर्व प्रशिक्षण व पोलीस, मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण या विविध स्पर्धा परीक्षांचे खाजगी नामांकित व गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग–नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण कालावधी दरम्यान दरमहा अनुक्रमे रु.१३,००० विद्यावेतन व एकरकमी आकस्मित निधी देण्यात येईल. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोग–राज्यसेवा परीक्षा, अभियांत्रिकी सेवा परीक्षा व न्यायिक सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी व पोलीस, मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण कालावधी दरम्यान दरमहा अनुक्रमे रु.१०,००० विद्यावेतन व एकरकमी आकस्मित निधी देण्यात येणार आहे. तसेच बँकिंग, रेल्वे, एलआयसी, इ. व तत्सम परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना दरमहा रु.६००० विद्यावेतन व एकरकमी आकस्मित निधी देण्यात येणार आहे. प्रशिक्षणासाठी विद्यार्थी निवड ही ऑनलाईन सामाईक प्रवेश परीक्षेद्वारे होणार असल्याचेही बार्टीचे महासंचालक श्री सुनिल वारे यांनी सांगितले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE